# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor - 2.143 | Indexed (IIJIF) | UGC Approved Sr. No. 64310

## SPECIAL ISSUE

IQAC Sponsored

One Day Interdisciplinary National Seminars

On

26 April, 2018 , Issue: I Vol. I

# समकालीन मराठी साहित्य आणि संस्कृती

प्रमुख संपादक

प्राचार्य. डॉ. जी.एच. जाधव

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा जि. उस्मानाबाद

संपादक

प्रा.डॉ. पद्माकर पिटले (जाजनूरकर)

मराठी विभाग प्रमुख,

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, जि. उस्मानाबाद

Organised By

Dept. of Marathi

Shri Chhatrapati Shivaji College, Omerga. Dist. Osmanabad

www.rjournals.co.in

Scanned with OKEN Scanner

DECLARATION BY THE PUBLISHER
ISSN 2319-8648
Special Issue - Issue I Vol. 1
CURRENT GLOBAL REVIEWER

PUBLISHED AT
Shaurya Publication , Latur

PUBLISHER
Arun B. Godam , Shaurya Publication, Latur,
www.rjournals.co.in Email: hitechresearch11@gmail.com

Chief Editor
Principal, Dr. G.H. Jadhav

Editor
Dr. Padmakar Pitle (Jajnurkar)

COVER DESIGNING
Mr. Arun B. Godam

PRINTING
R.R. Grapghics , MIDC , Latur

Views, idea and materials published in this proceeding are intellectual properties of author (s). Author(s) is/ are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

© All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from the Mr. Arun B. Godam, Shaurya Publication, Latur, Dist. Latur

**Mr. Arun B. Godam**
**Shaurya Publication, Latur** **26th April 2018**



Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue I Vol I, 26 April 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# Index


| Sr. No. | Title of Article - | Author | Page No. |
|---|---|---|---|
| १ | समकालीन - २१ व्या शतकातील मराठवाड्यातील मराठी कथा | प्रा. डॉ. जयद्रथ जाधव | 1 |
| २ | आजच्या मराठी कादंबरीतील सांस्कृतिक पर्यावरण | डॉ.महेश खरात | 10 |
| ३ | ग्रामीण साहित्य आणि जागतिकीकरण | प्रा.डॉ. राजकुमार किशनराव यल्लावाड | 18 |
| ४ | आदिवासी लोकसाहित्य : काळानुरूप बदललेला प्रवाह | डॉ. भास्कर श्रावण गायकवाड | 22 |
| ५ | ग्रामीण साहित्य आणि जागतिकीकरण | डॉ . जनार्धन परकाळे | 28 |
| ६ | स्त्रीवादी साहित्य आणि महिला सबलीकरण | प्रा. डॉ. आसिया चिश्ती | 31 |
| ७ | स्त्रीवादी साहित्यातून आलेले आत्मभाव स्त्रीवादी साहित्य आणि चळवळ | डॉ. सौ. जयदेवी पवार | 38 |
| ८ | वेदन : स्त्री अंतर्मनाचा अव्यक्त आवाज | प्रा.अर्चना रामचंद्र चव्हाण | 42 |
| ९ | समकालीन मराठी कवितेत जागतिकीकरणाचे उमटलेले पडसाद | प्रा.गजानन आनंता देवकर | 47 |
| १० | सामाजिक चळवळींचा प्रभाव आणि साहित्य | प्रा. रा.ज. चाटे | 54 |
| ११ | जागतिकीकरण आणि ग्रामीण कथा | प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | 62 |
| १२ | ग्रामीण साहित्य चळवळीच्या दृष्टीने गांधीवादी विचारधारेचे मुलगामीत्व | प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत | 67 |
| १३ | ग्रामीण साहित्य (बदलते संदर्भ : कादंबरी ) | प्रा. डॉ. लक्ष्मण बळीराम थिट्टे | 70 |
| १४ | मराठी ग्रामीण साहित्यातील बोलींचे संशोधन | डॉ.कैलास इंगळे | 73 |
| १५ | "राजा शिरगुप्पे यांच्या 'न पेटलेले दिवे' या कथा संग्रहाचे आकलन" | प्रा. लक्ष्मण बिराजदार , प्रो. डॉ. प्रभाकर कांबळे | 77 |
| १६ | "जागतिकीकरण आणि मराठवाडयातील ग्रामीण कथेचे बदलते स्वरुप" | प्रा. नागनाथ बनसोडे | 82 |




Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol I, 26 April 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

# जागतिकीकरण आणि ग्रामीण कथा

प्रा. डॉ. दादाराव गुंडरे
*मराठी विभाग प्रमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब,जि. उस्मानाबाद.*

--------- (11) ---------

२० व्या शतकाच्या अखेरच्या दशकात आपला देश एका निराळ्याच प्रकारच्या वसाहतिक सापळ्यात अडकला.
जागतिकीकरण असे त्या सापळ्याचे नाव आहे. वरकरणी ही संकल्पना लोभसवाणी, साधी, सरळ, कल्याणकारी अशीच
वाटते. परंतू ही समान पातळीवर चालत नाही. हीच तर खरी या जागतिकीकरणाची मेख आहे. याची मुख्य प्रेरणा आर्थिक
आहे. सर्वांपेक्षाही अतिभयानक, सर्वभक्षी अशी नवी आर्थिक व्यवस्था एक समस्या बनून सामान्य माणूस, शेतकरी,
कष्टकरी, बेरोजगार यांच्यापुढे उभी टाकली. जागतिकीकरणाच्या त्सुनामीत यांच्या तगण्याची आशाच शिल्लक राहिली
नाही. सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी माणसाचे जीवन, संस्कृतीच गिळकृंत करण्याचे काम झपाट्याने सुरु झाले.
जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर बऱ्यावाईटाचा विचार करणे क्रमप्राप्त झाले.

हजारो स्तरावर विभागलेला भारतीय समाज शेतीवर आणि शेतीशी निगडीत असणाऱ्या व्यवसायावर जगत होता.
जो या जगतिकीकरणाणे मोडकळीस आला. ग्रामीण भागाच्या उद्ध्वस्तीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. जागतिक पातळीवरील
व्यापार अनिर्बंधाने जेव्हा आपल्या देशावर आक्रमण केले तेव्हा त्याचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागासच बसला. उरले
सुरले ग्रामीण भागाचे कंबरडचे जणू मोडण्याचे काम केले. या प्रक्रियेत खेडूत माणूस अधिकच उघडानागडा झाला. एवढेच
नाही तर गेल्या काही वर्षात शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या याचा आणि जागतिकीकरणाचा निश्चित संबंध असल्याचे
लक्षात येते. याशिवाय खेड्याच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनात असंख्य गुंते निर्माण झाले. अशा या वास्तवास
कसे समोरे जायचे हा खरा प्रश्न आहे. जागतिकीकरण व ग्रामीण समाजावरील परिणामाबद्दल डॉ. नागनाथ कोतापल्ले
चिंतनगर्भ विचार मांडताना म्हणतात, "जागतिकीकरण आणि त्याचा परिणाम म्हणून जगभरातील शेतीमाल आता आपल्या
देशात येणार आहे, म्हणून तेथील शेतकऱ्याला कोणी काही प्रशिक्षण देण्याच्या मनःस्थितीमध्ये आहे का? शेतीची नवी यंत्रे
त्याला शिकविली पाहिजेत असे कोणाला वाटते का? या आणि असल्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी आहेत. म्हणजे
जास्तीत जास्त दुर्बल शेतकरी आता जागतिक स्पर्धेत उतरणार आहे! नव्हे, त्याला उतरावेच लागणार आहे
औदयोगिकीकरणाचा आणि नव्या तंत्रज्ञानांचा त्यास स्वीकार करावाच लागणार आहे. हे सगळे त्याला करता येईल का
वीज, पाणी, यासारख्या मुलभूत गरजाही जेथे त्याला उपलब्ध होऊ शकत नाहीत, तेथे तो या जगाच्या स्पर्धेत टिकणार त
कसा आहे? शेतीमालाला योग्य भाव मिळाला की सगळे सुरळीत होईल असे म्हणणे सोपे असते, पण शेतीमालाला भ
मिळवून देणे अवघड असते. एकंदरीत या जगतिकीकरणाच्या प्रक्रियेत खेड्यातील माणूस अधिकाधिक उगडा-नागडा ह
जाणार आहे. भ्रमचित्त होत जाणार आहे." अशा शब्दातून हे विपरीत वास्तव प्रकट केले.

जीवनातील तीव्र प्रश्नांची दाहकता जेव्हा प्रकर्षाने जाणवायला लागते तेव्हा चळवळ जन्मास येते. अशीच
चळवळ म्हणजे 'ग्रामीण साहित्य' होय. ज्या चळवळीचा ग्रामीण, शोषित माणूस हा केंद्रबिंदू आहे. ग्रामीण साहित
एकूण मराठी साहित्यातील १९६० नंतर ठळकपणे पुढे आलेला एक प्रमुख प्रवाह आहे. ग्रामीण जीवनास संपूर्णपणे आ
परिघात सामावून घेण्याचे कार्य केले. कथा, कादंबरी, नाटक, कविता अशा विविध प्रकारात साहित्य निर्माण झाले.


Copyright © Shaurya Publication, Latur

Scanned with OKEN Scanner

ग्रामीण कथेने साहित्यासह कथेचे दालन समृध्द केले. जागतिकीकरण हे शेतीला वापरल्या जाणाऱ्या दंतावळ्यासारखे आहे असे म्हटले जाते. त्याला अनेक दात आहेत. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकिय, कृषी विभागांना त्याने व्यापले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या भूमिकेतून भिन्न-भिन्न विद्याशाखांच्या माध्यमातून त्याचा विचार केला गेला. जागतिकीकरणाचा पडलेला प्रभाव, लेखक-कलावंतानी स्वीकारलेले आव्हान या बदलाची नोंद घेतली. याचा शोध या लेखातून घेण्याचा प्रयत्न आहे.

मराठी ग्रामीण कथेची समृध्दता ही मराठी भाषेची वैशिष्टयपूर्णच आहे. १९६० नंतर मराठी ग्रामीण कथा प्रभावीपणे मांडली जात असली तरी तिचा प्रवास इ.स. १९९८ च्या हरिभाऊ आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठिण आला' या दुष्काळावरील कथेपासून होतो. १८९८ ते १९९० पर्यंतची कथा दुष्काळ, भूक, दारिद्र्य, शोषण, लुबाडणूक, राजकारण्यांचा फोलपणा, औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण व सहकार चळवळी यासारख्या प्रश्नाभोवती फिरत नानविध आशय विषयांसह विस्तारपुर्वक प्रकट झाली.

मराठी ग्रामीण कथेत जागतिकीकरणाच्या धरतीवर सशक्तपणे कथालेखन करणारी पिढी क्रमशः दिसून येते. दुसऱ्या व तिसऱ्या पिढीतील लेखकांनी सुध्दा यांचा वेध घेतला. ग्रामीणांच्या पायाभूत व मुलभूत गरजा पूर्ण होताना दिसत नाहीत. अशा वास्तवाची नोंद रा.रं. बोराडे यांनी सुध्दा यांचा वेध घेतलेली दिसते. 'रोजगार, भरती' यासारख्या कथेतून दारिद्र्य व बेरोजागरीचा प्रश्न मांडला.

भास्कर चंदनशिव यांनी 'अंगारमाती' या कथा संग्रहातील 'हिशोब' कथेतून दारिद्र्य व बेरोजगरीचा प्रकाश टाकला. या कथेतील महिपती बी. कॉम. पदवीधर तरुण बेकार राहतो. दुसरीकडे शेतीकामही जमत नसल्याने त्याचा बाप तात्या सानप बी. कॉम. म्हणजे बेकामी असे हिणवताना दिसतो. शिक्षण घेऊन होणाऱ्या परवडीस महिपतीच्या माध्यमातून उकलून दाखवतात.

जागतिकीकरणाने जी स्थिती ऊस उत्पादक, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची ती स्थिती कांदा उत्पादक शेतकऱ्यांची असल्याचे दर्शन 'सडणी' कथेतून घडविले. खुल्या आर्थिक धोरणानुसार आयात मालावरील कर कमी केल्याने परदेशी मालाची आवक वाढली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कांदयास योग्य भाव मिळाला नाही. राजकारणी व भ्रष्ट कर्मचाऱ्यांकडून त्याची योग्य दखल घेतली नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्येचा पर्याय निवडतो शेतकऱ्याविरुध्दची धोरणे, भ्रष्ट शासकिय यंत्रणा व राजकारणी यांच्या भट्टीत तो तावून सुलाखून निघतो आहे. त्याच्या जीवनाचा कोळसा होत आहे. ही शेतकऱ्याची वर्तमान 'होरपळ' कथेतून येताना दिसते. म्हणून त्यांच्या कथेचा संबंध जागतिकीकरणाशी जोडला येतो.

अनंत भोयर यांची 'हराळी' कथा पुर्वी सावकाराकडून शेतकऱ्याचे शोषण केले जात होते. आता ते शहरी श्रीमंताकडून होत आहे हे दाखवून देते. शहरातील काळे धंदेवाले, लोक, नोकरदार यांच्याकडून शेती खरेदी केली जाते. ही प्रवृती हराळीसारखी असल्याचे ते सुचित करतात.

सदानंद देशमुख यांनी 'लचांड' संग्रहातील 'भडकी' कथेतून आजच्या मागासलेल्या व भकास बनलेल्या खेड्याचे दर्शन घडवले. शेतमालाची परवड होत गेल्याने शेतकरी व्यापाऱ्याच्या जाळ्यात दिवसेंदिवस कसा अडकत आहे. यांचे सुचक दर्शन 'महालुट' कथेतून घडविले. ग्रामीण उदयोगधंदे व शेतीस पूरक व्यवस्था वाढीस लावून अर्थकारण

बदलेले. शेतीत कष्ट करुन मरण्यापेक्षा ती विकून जूने ट्रॅक्टर घेऊन भाडोत्रीचा व्यवसाय करतो. पैसे मिळविण्यात व्यक्तीची धडपड व्यर्थ जाते. तो अडचणीत सापडतो. याचे चित्रण 'भणंक' कथेतून घडविले. नवशोषक वर्ग, शेतकऱ्याचेशोषण, शेतमजूरांचे दैन्य, दुःख व वाटयास येणारी बेकारी यावर प्रकाश टाकला. खेड्यातील व्यापारी, दलाल, कर्मचारी यांच्याकडून होणारी जी लूट आहे याचे ते चित्रण करतात.

अशोक कोळी 'आमचं कसं होईल' या कथेतून ग्रामीण बेकारीचे चित्रण जागतिकीकरणाच्या परिणामातून सुचकपणे दाखवतात. या प्रक्रियेत कोणतेच स्थान उरत नाही. हे समोर आणतात. ग्रामीण कथेच्या प्रांतातील एक लक्षणीय नाव म्हणजे आसाराम लोमटे. ज्यांचा 'इडापिडा टळो' (२००६) तर नुकताच साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेला 'आलोक' कथासंग्रह प्रसिध्द आहे. ग्रामीण जीवनाविषयी कमालीची आस्था असणारा हा कथालेखक येथील जीवनास थेट भिडतो. जागतिकीकरणाने आजचं खेडं बदलल असं जाणवत असलं तरी खेडयातील मूळ प्रश्न कायम असल्याचे दिसते. या समस्येचा थेट भिडतो. जागतिकीकरणाने आजचं खेडं बदलल असं जाणवत असलं तरी खेड्यातील मूळ प्रश्न कायम असल्याचे दिसते. या समस्येचा वेध खोलवर जाऊन घेतला. ग्रामीण विकासाच्या योजना खेडयापर्यंत पोहचल्या असल्या तरी गरीब, दरिद्री माणूस तिथेचं आहे. याचे चित्र 'इंडापिडा टळो' यातील कथामधून येते. त्यांची पहिलीच 'बेईमान' ही कथा ग्रामीण मानसिकतेवर प्रकाश टाकते. खोट्या प्रतिष्ठेसाठी सामान्य माणसांचा कसा बळी जातो हे. या कथेतील भगीरथ या पात्रातून दाखवून दिले. राजकारणातील बेईमानीचा, स्वार्थी, सत्तांध, गटातटाच्या राजकारणाचा वेध त्यांची ही कथा घेते.

सहकारी संस्थाचा विकास हा अपेक्षेप्रमाणे निकोप पध्दतीने झाला नाही. उलट सहकारात स्वार्थी व गटातटाचे राजकारण करुन सर्वसामान्य शेतकऱ्याचे शोषण केले जाऊ लागले. असेच लागवड करणाऱ्या शेतकऱ्याचे सर्व पातळयावरील शोषण 'चरक' कथेतून दाखविले सुडाच्या राजकारणाचा बळी ठरलेल्या शेतकऱ्याच्या चिरंतन दुःखाची ही कथा आहे. जागतिकीकरणानंतर बदललेल्या राजकीय व्यवस्थेने शेतकऱ्यास उद्ध्वस्त केले. सहकारी राजकारणाची धोरणेचं त्याच्या विनाशास कारणीभूत असल्याची जाणीव त्यांची ही कथा करुन देते.

ग्रामीण जीवनात सर्व स्तरावर शोषण चालते. खेडयातून पोटासाठी आलेल्या माणसांच्या जाणीवा 'जिनगानीचा काळ' ही कथा व्यक्त करते. यामध्ये मच्छिंद्र या सुशिक्षीत तरुणाची कोंडी दाखवली आहे. जी दरिद्री कुटूंबातील तरुण मनाची आहे. राजकारणाच्या प्रभावाने गाव पक्षा -- पक्षात विभागला जात आहे. हे 'खुदळण' कथा सांगते. 'ओझं' ही कथा शेतकऱ्याच्या आत्महत्येवर विचार करायला लावते. याशिवाय वर्तमान ग्राम जीवनात होणारे सकारात्मक बदलही टिपतात.

उत्तम बावस्कर 'इस्कोट' कथासंग्रहातून शेतकरी जीवनाचे दाहक वास्तव मांडतात. खेडयाच्या उद्ध्वस्ततेचा विलक्षण अविष्कार घडवितात. 'पंचनामा' ही कथा शेतकऱ्याच्या मालास योग्य भाव न देणारी यंत्रणा अस्तित्वात आल्याने भ्रमनिरास झालेला शेतकरी आत्महत्येकडे वळतो याचे जिवंत चित्र उभे करते. सहकार खात्यातील भ्रष्टाचार, शासनाची चुकीची धोरणे, राजकारणी, भ्रष्ट अधिकारी, यांच्या पिळवणूकीने शेतकऱ्याच्या जीवनात बकालपण आले. हे 'सापळा' कथेतून दाखवतात. या कथेतील माणीकराव हा कापूस उत्पादक शेतकरी जेव्हा सर्व बाजुंनी कोंडीत पकडला जातो तेव्हा



Scanned with OKEN Scanner

त्याच्या तोंडून हताशपणे उद्‌गार निघतात. तो म्हणतो ''कसं व्हायचं आपलं? आपल्या घरादाराचं? त्याचं मन म्हणत व्हतं काय बी खरं न्हाई या कोरडवाहू शेतकऱ्याचं! त्येच्याकडं नगदी पैसा देणारा ऊस ना माळवं! त्याचं पैस्याचं पिक म्हंजी कापूस! पण त्येचंबी हये आस्सं हाय. पिकला तं कापूस न्हाईतं कडबा ना भूस!'' अशा शब्दातून शेतकऱ्यांच्या जीवनातील दुष्टचक्र पुढे ठेवतात.

अंबादास केदार यांनी 'येस्कर', 'चिपाड', 'चऱ्हाट' या कथासंग्रहातून शेतकऱ्यांच्या वेदनेस बोलते केले. सहकारी संस्थेच्या माध्यमातून शेतकरी वर्ग एका दुष्ट आवर्तनात सापडला. यामुळे तो खचल्याचे, उद्ध्वस्त झाल्याचे दाखवतात. राबणाऱ्या, आर्थिकदृष्ट्या नागवलेल्या शेतकऱ्याच्या व्यथा 'चिपाड', 'बयनामा' व 'बटई' सारख्या कथेतून मांडतात. याशिवाय जागतिकीकरणाच्या दुष्ट चक्रात सापडलेल्या कृषीवाल्या संस्कृतीचे वास्तवचित्र, ग्रामीणांच्या नव्या जाणीवा अनेक कथाकारांनी मांडल्या. ज्यामध्ये ज्यामध्ये श्रीराम गुंदेकर, प्रदीप पाटील, बाबाराव मुसळे, गेनू शिंदे, महेंद्र कदम, भास्कर बडे, गणेश आवटे, प्रकाश खरात, नागनाथ पाटील, शिवाजी मुंढे, अर्जून व्हटकर, प्रभाकर हरकळ, भिमराव वाघचौरे, भारत काळे, उमेश मोहिते व मिलिंद् बोकील यासारखे कथालेखक ग्रामीण जीवनाचे विविध पदर सशक्तपणे उलगडून दाखविताना दिसतात.

थोडक्यात सांगायचे तर जागतिकीकरण या गोंडस नावाने शोषणाचाच भयावह चेहरा सर्वत्र वावरताना दिसतो आहे. हे साम्राज्यावादाचे, वसाहतवादाचे आजचे रुप आहे. याने निर्माण केलेल्या समस्येचा गरीब व शोषित वर्गाशी थेट संबंध येतो. किंबहूना शोषितांच्या, गरीबांच्या, श्रमीकांच्या व शेतकऱ्याच्या एकूण समाजाच्या तळाशी असणारा हा सर्व वर्गच अधिक होरपळला जात आहे. त्यामुळे शोषणाचे सर्वंकष रुप जागतिकीकरणातून कसे प्रकट होते हे ग्रामीण कथेने दाखवून दिले आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशावर या आर्थिक जागतिकीकरणाचा किती गंभीर परिणाम होतो. याविषयी वंदना शिवा यांनी लिहिले आहे, ''आर्थिक जागतिकीकरणामुळे बी-बियाणे, उद्योगाचे केंद्रीकरण, जागतिक व्यापारी मंडळाचा कृषी व्यवसायात प्रवेश, किटकनाशकांचा वाढता वापर... विदर्भातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यामध्ये मोठे प्रमाण कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचे आहे. अशा निष्कर्ष तज्ज्ञांनी काढलेला आहे. या वरुन असे लक्षात येते. की, वरील गोष्ट आर्थिक जागतिकीकरणाशी संबंधीत आहेत.

निष्कर्ष -

साहित्य निर्मितीची बीजे जीवनातील वास्तवातच असतात. त्यामुळे जीवन व साहित्य यांचा घनिष्ठ संबंध आहे. जीवनातील दाहक प्रश्नांच्या अनुषंगाने मानवतावादी मुल्यावर आधारीत साहित्यांची निर्मिती झाली. अशा काही साहित्य चळवळी पैकी ग्रामीण साहित्य ही एक चळवळ आहे. तिचा ग्रामीण, शोषित माणूस हा केंद्रबिंदू आहे. त्याच्या उत्थानासाठी, मुक्तीसाठी ती कटिबध्द आहे. वर्तमान ग्रामीण जीवनातील ताणतणाव, स्थित्यंतरे ग्रामीण कथेतून अत्यंत परिणामकारकरित्या चित्रीत झाले. समाजसन्मुख अशी ही कथा केवळ सामाजिक प्रश्नाचे चित्रण करणारी नाही तर ती चिंतन करणारी आहे. या कथा लेखनातून आजची ग्रामीण कथा कोणत्या वळणावर आहे. यांचे ज्ञान होते. जागतिकीकरणाच्या अक्रमणात बदलत्या संदर्भात आपले विचार कथेद्वारे व्यक्त केले. जागतिकीकरण म्हणजे पूर्णपणे आर्थिक जागतिकीकरण असे समीकरण झालेले दिसते. या विपरीत वास्तवाची चाहूल, त्याला शोध अनेक कथाकारांनी घेतला. जी बदलत्या ग्रामीण साहित्यांची खूण म्हणायला हरकत नाही. जागतिकीकरण हा आजचा गुणधर्म आहे. त्यानुसार



Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol I, 26 April 2018
UGC Approved Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

कथा निर्मिती होताना दिसते. सामान्य माणसाच्या, शेतकऱ्याच्या जीवनात येणाऱ्या वास्तवातून व वेदनेतून हे साहित्य निर्माण झाले आहे. त्यामुळे वेदनेशी नाते सांगणारे हे ग्रामीण कथासाहित्य ठरते. भारतीय, अर्थव्यवस्थेचा कणा असणारा शेतकरी व त्यावर अवलंबून असणारा समाज या प्रक्रियेत करा संपुष्टात येण्याची भिती निर्माण झाली आहे. याची नोंद ग्रामीण कथाकारांनी घेतली. ग्रामीण कथा आशय व अभिव्यक्तीच्या बाबतीत विविध अंगाने विकसीत झालेली दिसते. बदलते ग्रामीण भावविश्व प्रकट केले. १९९० नंतर जागतिकीकरणाच्या अंगाने ग्रामीण जनसमुहातील बदलांचा विचार व भावभावना मांडणारे कथा लेखन वास्तववादी व खाऊजा व्यवस्थेला साकार करणारे आहे. या कथा आत्मशोध करायला भाग पाडतात. काही वेळा व्यवस्थेविरुध्दचा विद्रोह काही कथेतून येतो. राजकारण, प्रशासन, सावकार, दलाल व भांडवलदाराकडून शेतकऱ्याची पिळवणूक होते. अशा ग्रामीण भागातील राजकिय, आर्थिक सामाजिक परिस्थितीवर प्रकाश पडतो. ग्रामीण कथालेखन अस्सल प्रादेशिक बोलीभाषेत, कलात्मक व वास्तवाचे भान तसेच कथाशयाच्या दृष्टीने मनाचा ठाव घेणारे आहे. वाचकाला अंतर्मुख व विचारप्रवृत करणारे ग्रामीण कथालेखन आहे. एकूणच १९९० नंतरचे ग्रामीण कथालेखन जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या समस्येवर, स्थितीगतीवर वर्तमानातल्या नव्या प्रश्नांना व जाणीवांना भिडणारे आहे असेच दिसते.

**संदर्भ ग्रंथ -**

१) डॉ. शरद गायकवाड, प्रा. सुनिल शिंदे (संपा.), 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य,' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १७ ऑक्टोबर २००९

२) डॉ. प्रवीण बनसोड, प्रा. गावंडे (संपा), 'जागतिकीकरण ग्रामीण साहित्य,' किर्ती प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती २४ जानेवारी २००९

३) प्रा. भास्कर चंदनशिव, 'अंगारमती' साकेत प्रकाशन औरंगाबाद प्रथमावृत्ती १९९१

४) डॉ. वासूदेव मुलाटे, 'ग्रामीण कथा: स्वरुप आणि विकास,'साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी १९९२

५) डॉ. जयद्रथ जाधव (संपा), '१९८० नंतरचे मराठी साहित्य: स्वरुप व समीक्षा'

६) डॉ. राजश्री पवार, 'साहित्य परीघ,' कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र.आ. जानेवारी २०१०

७) आसाराम लोमटे, 'इडापिडा टळो'

८) आसाराम लोमटे, 'आलोक'

९) उत्तम बावस्कर, 'इस्कोट'

१०) श्रीधर नांदेडकर (संपा), 'प्रतिष्ठाण मार्च-एप्रिल-मे-जून २००८ मराठवाडा साहित्य विशेषांक'



Scanned with OKEN Scanner